(4) विभक्ती प्रत्यय

नियम –

1) विभक्ती प्रत्यय हे फक्त नाम आणि सर्वनामालाच लावले जातात.

2) विभक्ती प्रत्यय हे धातूंना (क्रियांना) लावले जात नाहीत.

3) प्राकृतात चतुर्थी / षष्ठी चे प्रत्यय समानच आहेत. म्हणून प्राकृतामध्ये चतुर्थी विभक्ती नसते. चतुर्थी ऐवजी षष्ठी विभक्ती प्रत्ययाचा उपयोग करतात.

4) गच्छ (जाणे, येणे) या धातूसाठी मराठीभाषेत सप्तमीचा वापर केला जातो. परंतु प्राकृतात त्यासाठी द्वितीया विभक्ती एकवचन वापरले जाते.

1) विभक्ती प्रत्ययांचा उपयोग

1) प्रथमा (कर्ता) विभक्ती :– वाक्यातील कर्ता प्रथमा विभक्तीने दर्शविला जातो. (कर्म द्वितीया असते)

उदा. 1) **रामो** आमं खाइ। 2) **लया** पोत्थयं पढइ।

2) द्वितीया (कर्म) विभक्ती :– वाक्यातील कर्म द्वितीया विभक्तीने दर्शविले जाते. (कर्माची द्वितीया वापरतात) उदा. रामो **आमं** खाइ।

3) तृतीया (करण) विभक्ती :– वाक्यातील क्रिया कोणाकडून घडली ते दर्शविण्यासाठी तृतिया विभक्तीचा वापर केला जातो. उदा. – **रामेण** आमो खाइ।

4) चतुर्थी / षष्ठी (संप्रदान) विभक्ती :– संबंध दर्शविण्यासाठी षष्ठीचा उपयोग करतात.

उदा. 1) रामो दसर**हस्स** पुत्तो। 2) रामो सीया**ए** पइ अत्थि।

5) पंचमी (अपादान) विभक्ती :– वाक्यांमध्ये 'पासून, ऊण – हून' असे असले तेव्हा पंचमीचा उपयोग करतात.

उदा. 1) रामो एगं गा**माउ** बिअं गामं गच्छइ। 2) माला (गिहाउ) **गिहाओ गच्छइ।**

6) सप्तमी (अधिकरण) विभक्ती :– ठिकाण, स्थल (मध्ये, आत) दर्शविण्यासाठी सप्तमीचा उपयोग केला जातो.

उदा. 1) रामो **उज्जाणे** कीलइ। 2) रामो **उज्जाणम्मि**। (**उज्जाणे**) चिट्ठइ। 3) सीमा **मंदिरम्मि** गच्छइ।

7) **संबोधन विभक्ती** :- हाक मारणे, निमंत्रण देणे, बोलावणे इ. साठी संबोधन विभक्तीचा उपयोग करतात. उदा. हे राम, हे माला, हे माले.

II) प्राकृत वाक्य रचनेसाठीचे घटक

1) अर्धमागधी - प्राकृतभाषेत वाक्यरचना करण्यासाठी काळाचे प्रत्यय, सर्वनामाचे प्रत्यय विभक्तीचे प्रत्यय आणि प्राकृत शब्दांचा संग्रह अत्यंत आवश्यक आहे.

2) कोणत्याही भाषेतील वाक्यरचना करते वेळी कर्त्याचे जे लिंग, वचन, असेल त्याप्रमाणे क्रियापदाचे लिंग, वचन वापरणे आवश्यक असते.

3) कर्त्याच्या लिंग वचनानुसार कर्माला विभक्ती प्रत्यय जोडण्यात येतात.

4) वाक्यात व्यक्तीचे, वस्तूचे नाव असेल तेव्हा तृतीय पुरुषी क्रियापदाचा वापर केला जातो. उदा. राम अत्यंत शक्तीशाली योद्धा आहे. (रामो अच्चंतसत्तीसाली जोद्धं अत्थि।)

1) या वाक्यात 'राम'हा प्रमुख कर्ता आहे. त्याची प्रथमा विभक्ती (प्रत्यय) आहे.

2) कर्माची (जोद्धा) द्वितीया वापरली आहे.

3) राम हे नाव असल्याने वर्तमानकाळाच्या तृ. पुरुषी एक वचनी क्रियापदाचा वापर केलेला आहे.

विभक्ती प्रत्यय (प्राकृत आणि मराठी)

कारक	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	ओ (कर्ता)	आ
द्वितीया	(अनुस्वार) (कर्म)	आ
तृतीया	एण, एणं (ने, कडून, च्या करवी)	एहि, एहिं
पंचमी	आउ, आओ (पासून, ऊण, हूण)	हिंतो
चतुर्थी/षष्ठी	अस्स (चा, ची, चे)	आण, आणं
सप्तमी	ए, म्मि, अंसि (मध्ये, आत)	एसु, एसुं
संबोधन	अ	आ

(i) 'देव' आकारान्त पुलिंगी नाम चालविणे

कारक	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	देवो, देवे	देवा
द्वितीया	देवं	देवे, देवा
तृतीया	देवेण, देवेणं	देवेहि, देवेहिं

पंचमी	देवाउ, देवाओ	देवाउ, देवाओ, देवाहिंतो
चतुर्थी/षष्ठी	देवस्स	देवाण, देवाणं
सप्तमी	देवे, देवम्मि देवंसि	देवेसु, देवेसुं
संबोधन	देव	देवा

(**सूचना :–** राम, शाम, गोविंद, चंद इ. सर्व अकारान्त पुल्लिंग नामे 'देव' याप्रमाणे चालतात.)

(ii) 'वणं' अकारान्त नपुसकलिंगी नाम चालविणे

कारक	ए.व.	अ.व.
प्रथमा	वणं	वणाइं, वणाणि
द्‌वितीया	वणं	वणाइं, वणाणि
संबोधन	वणं	वणाइं, वणाणि

(**सूचना :–** 1) बाकीच्या विभक्ती 'देवा'प्रमाणे चालतात 2) 'वणं'या नपुसकलिंगी नामाप्रमाणे इतर सर्व नपुसकलिंगी नामे चालतात.)

(iii) 'माला' आकारान्त (स्त्रीलिंगी) नामे चालविणे.

कारक	ए.व.	अ.व.
प्रथमा	माला	माला, मालाओ
द्‌वितीया	मालं	माला, मालाओ
तृतीया	मालाए	मालाहि, मालाहिं
पंचमी	मालाए, मालाओ	मालाहिन्तो
चतुर्थी/ षष्ठी	मालाए	मालाणं, मालाण
सप्तमी	मालाए	मालासु, मालासुं
संबोधन	माला, माले	माला, मालाओ

(**सूचना :–** सर्व आकारान्त स्त्रीलिंग नामे 'माला'प्रमाणे चालतात.)

(iv) इकारान्त व उकारान्त पुल्लिंगी नाम चालविणे

कारक	ए.व.	अ.व.
प्रथमा	मुणी	मुणिणो, मुणीओ
द्‌वितीया	मुणिं	मुणिणो, मुणीओ

तृतीया	मुणिणा	मुणीहि, मुणीहिं
पंचमी	मुणिणो, मुणिओ	मुणिहिन्तो
चतुर्थी/षष्ठी	मुणिणो, मुणिस्स	मुणिण, मुणिणं
सप्तमी	मुणिंसि, मुणिम्मि	मुणीसु, मुणीसुं
संबोधन	मुणि	मुणिणो, मुणीओ

(v) 'साहु'(पु. नाम)

कारक	ए.व.	अ.व.
प्रथमा	साहू	साहूणो, साहूवो
द्विवितीया	साहूं	साहूणो, साहूवो
तृतीया	साहूणा	साहूही, साहूहिं
पंचमी	साहूणो, साहुओ	साहुहिन्तो
चतुर्थी/षष्ठी	साहूणो, साहुस्स	साहूण, साहूणं
सप्तमी	साहुंसि, साहुम्मि	साहुसु, साहुसुं
संबोधन	साहु	साहुणो, साहुणे

(vi) अनियमित नामे

संस्कृतमधील ऋकारान्त व इतर व्यंजनात शब्दांवरून अर्धमागधी-प्राकृतमध्ये जी रूपे (शब्द) नामे येतात त्यांना अनियमित शब्द म्हणतात. यामध्ये संबंधदर्शक गट आणि कर्तृत्ववाचक शब्दांचा गट असे दोन प्रकार आहे.

उदा. 1) पितृ = पिउ, मातृ = माउ   2) कर्तृ = कत्तु, दातृ = दाइ, दाउ

(i) 'राया' (पु. नाम)

कारक	ए.व.	अ.व.
प्रथमा	राया	रायाणो, राइणो
द्विवितीया	रायाणं, रायं, राइणं	रायाणो, राइणो, रन्नो
तृतीया	राइणा, रन्ना, राएण	राईहि, राईहिं
पंचमी	राइणो, रन्नो	राईहिन्तो
चतुर्थी/षष्ठी	राइणो, रन्नो, रायस्स	राईण, राईणं
सप्तमी	राइम्मि, रायास	राईसु, राईसुं
संबोधन	राया, राय, रायं	रायाणो, राईणो

(ii) माया (स्त्री) नाम

कारक	ए.व.	अ.व.
प्रथमा	माया	मायरो
द्वितीया	मायरं	मायरो
तृतीया	मायाए, माऊए	मायाहि, मायाहिं
पंचमी	माऊए, मायाउ	माऊहिन्तो, माईहिन्तो
चतुर्थी/षष्ठी	मायाए, माउए	माऊणं, माईणं
सप्तमी	मायाए, माउए	माउसुं, माईसुं
संबोधन	माया	मायरो

(iii) पिया (पिता) पु. नाम

कारक	ए.व.	अ.व.
प्रथमा	पिया, पियरो	पियरो
द्वितीया	पियरं	पियरो, पियरे, पियरा
तृतीया	पियरेण, पियरेणं, पिउणा	पियरेहि, हिं, पिउहि, पिइहिं
पंचमी	पियराओ, पिउणो	पियरेहिन्तो, पिउहिन्तो, पिइहिन्तो
चतुर्थी/षष्ठी	पियरस्स, पिउस्स, पिउणो	पियराण, णं, पिउणं, पिईणं
सप्तमी	पियरे, पियरम्मि	पियरेसु, सुं, पिऊसुं, पिईसु
संबोधन	पिय, पियर	पियरो

(भाऊ, जामाउ, अम्मपिउ, मायापिउ, इ शब्द ‘पिउ’ प्रमाणे चालतात.)

‘कत्ता’(कर्ता) पु. नाम चालविणे

कारक	ए.व.	अ.व.
प्रथमा	कत्ता, कत्तारो	कत्तारो, कत्तारा, कत्ता
द्वितीया	कत्तारं	कत्तारो, कत्तारा, कत्ता
तृतीया	कत्तारेण, कत्तारेणं	कत्तारेहि, कत्तारेहिं
चतूर्थी/षष्ठी	कत्तारस्स, कत्तुणो	कत्ताराण, कत्ताराणं
पंचमी	कत्तराओ	कत्तारेहिन्तो
सप्तमी	कत्तारे, कत्तारम्मि	कत्तारेसु, कत्तारेसुं
संबोधन	कत्ता	कत्तारो, कत्तारो